# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.09.2025** **वारःबुधवार**

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज स्वस्थ नारी सशक्त परीवार आणि राष्ट्रीय पोषण माह अभियानाचा प्रारंभ
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंच्चाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात सेवा पंधरवड्याला आज सुरुवात
3. ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग विषयी धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी,
4. हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मराठवाड्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन
5. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारीपर्यंत घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश आणि
6. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे राज्यातल्या 30 जिल्ह्यांमध्ये पिकांचं मोठं नुकसान

**पंतप्रधान-स्वस्थनारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर जात आहेत. त्यांच्या हस्ते धार इथं 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' आणि 'आठव्या राष्ट्रीय पोषण माह' अभियानाला प्रारंभ होणार आहेत. ही मोहीम आजपासून दोन ऑक्टोबर पर्यंत सुरू राहील. या कालावधीत देशभरातली आयुष्मान आरोग्य मंदिरे, आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये आणि इतर सरकारी आरोग्य सुविधा केंद्रांमध्ये आरोग्य शिबिरं आयोजित केली जाणार आहेत. राज्यातही विविध जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबवली जाईल. यामध्ये महिलांच्या आरोग्य तपासणीसह उपचार, आवश्यक संदर्भ सेवा तसंच समुपदेशन करण्यात येणार आहे.

**पोषण-नवी मुंबई**

पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ होणाऱ्या पोषण अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातील ग्रामीण, आदिवासी आणि नागरी क्षेत्रातील एकंदर 553 बाल विकास प्रकल्पातील एक लाखाहून अधिक अंगणवाडी केंद्रामध्ये होणार आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनचे आयुक्त कैलास पगारे यांनी काल नवी मुंबईत पत्रकार परिषदेत या उपक्रमांची माहिती दिली.

**पंतप्रधान-वाढदिवस कार्यक्रम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंच्चाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम होतील; त्याचबरोबर 'विकसित भारत संवाद' ही ऑनलाइन व्याख्यानमालाही होणार आहे. तसंच रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी शिबिरे, आरोग्यविषयक कार्यशाळा, पथनाट्य असे कार्यक्रमही होणार आहेत. युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीने, स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात येणार आहे.

**भाजप सेवा पंधरवडा**

भारतीय जनता पक्षाच्या वतीनंही मोदींच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा साजरा केला जाणार आहे. या दरम्यान, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी, मोदी विकास मॅरेथॉन, क्रीडा स्पर्धा आदी उपक्रम आयोजित केले जाणार असल्याची माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काल दिली.

**पंतप्रधान वाढदिवस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज पंच्याहत्तरावा वाढदिवस. सर्वसामान्य कार्यकर्ता ते जगातील प्रभावशाली राजकीय नेत्यांपैकी एक होण्यापर्यंतचा नरेंद्र मोदी यांचा प्रवास विलक्षण आहे. पण राजकारणाच्या पलीकडे पंतप्रधान मोदी एक व्यक्ती म्हणून कसे आहेत? हे जाणून घेण्यासाठी ऐकुया काही नामवंत व्यक्तींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी काढलेले गौरवोद्गार.....

**लेखिका आणि समाजसेविका सुधामूर्ती म्हणाल्या की नरेंद्र मोदी हे मानवतेप्रती निष्ठा ठेवून पंच्याहत्तराव्या वर्षीही तरुणांच्या तडफेने कार्यरत आहेत....**

***ही वर्क्ड व्हेरी हार्ड टॉवर्ड्स नेशन एंड स्टिल वर्किंग टेक अ यंगस्टर ड्यु टु हिज सेव्हेंटी फाइव्ह. लोकहित करणीयम इस प्रोबेबली हिस मंत्रा एंड व्हिच हे हास फॉलोव्ड थ्रॉगउट हिस लाईफ.***

**ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता मोदीजींविषयी बोलताना म्हणाले....**

***इस पीढी में मोदीजी सेल्फ मेड नेताओं में से एक है तो वो एक युनिक फिनोमेनन है भारतीय पॉलिटिक्स के लिए।***

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहृदय स्वभावातच त्यांच्या च्या प्रभावशाली राजकीय कारकिर्दीचं यश दडलेलं आहे असं सांगत सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले पंतप्रधानांविषयी म्हणाल्या...**

***वो सभ्य पुरुष मैंने इसलिए कहा के लोग गाली गलोच करते हैं, वो हम सुनते है ना, मैंने कभी उनके मूंसे किसी के लिए बुरा नही सुना मुझे ऐसा लगा की बहुत सभ्य और अच्छे दिल के इंसान है।***

**प्रसिद्ध भजन गायक अनूप जलोटा पंतप्रधानांविषयी बोलताना म्हणाले...**

***मोदीजी ने इस देश को जो सम्मान दिलाया हैं, जो शक्ति दी है वो अभी तक किसी भी प्रधानमंत्री द्वारा प्राप्त हुई।***

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयीचे हे गौरवोद्गार राजकारणाच्याही पलीकडे जाऊन भारताच्या भविष्यकालीन दूरदृष्टीविषयी खूप काही सांगून जातात अशी दूरदृष्टी ज्यामध्ये आशेचं तेज आहे, जी आधुनिकतेची कास धरून स्वप्नांना नवा आकार देते, अशी दूरदृष्टी जी सतत भारताचं गौरवशाली भविष्य घडवत आहे.**

**अँनिमेशन धोरण इतर मंत्रिमंडळ निर्णय**

राज्याच्या ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी 2025 धोरणाला काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या क्षेत्राला उद्योग आणि पायाभूत क्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. यामध्ये पुढील पंचवीस वर्षांचं नियोजन करण्यात आलं असून 3 हजार 268 कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. येत्या वीस वर्षांच्या काळात या क्षेत्रात 50 हजार कोटींची गुंतवणूक तसंच 2 लाख नवे रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय मंत्रिमंडळानं काल इतरही काही महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आणि मुलींना स्वच्छता प्रसाधन यासाठीच्या भत्त्यात वाढ करण्यात आली आहे. राज्यभरात 79 बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवनाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. राज्यातील पायाभूत प्रकल्पांसाठी कार्यरत असलेल्या पायाभूत सुविधा उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा देण्याचा निर्णयही कालच्या बैठकीत घेण्यात आला.

**मराठवाडा मुक्ती दिन-बीड हिंगोली जालना**

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मराठवाड्यात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं सिद्धार्थ उद्यानातल्या स्मृतिस्तंभ परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. तर बीड इथं उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्येही आज ध्वजारोहण आणि अन्य कार्यक्रम होणार आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या फुलंब्री इथं मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभही आज होणार आहे. तसंच अमळनेर -बीड या नव्या रेल्वेमार्गाचं उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेगाडीचा प्रारंभही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका**

राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारी 2026 पर्यंत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल राज्य निवडणूक आयोगाला दिले. यापुढे यासाठी आणखी मुदतवाढ दिली जाणार नाही, असंही न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं स्पष्ट केलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी यापुर्वी सर्वोच्च न्यायालयानं 6 मेची मुदत दिली होती. मात्र ती न पाळल्याबद्दल आयोगावर ताशेरे ओढतानाच प्रभाग पुनर्रचना प्रक्रिया 31 ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. निवडणुकांसाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचे तपशील दोन आठवड्यांच्या आत राज्याच्या मुख्य

सचिवांकडे सादर करावेत. शिवाय ईव्हीएम मशीनची कमतरता दूर करून त्या संदर्भातलं शपथपत्र येत्या 30 नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे निर्देशही न्यायालयानं आयोगाला दिले आहेत.

**जीएसटी प्रतिक्रिया**

वस्तू आणि सेवा करामध्ये नुकत्याच जाहीर केलेल्या दर कपातीचा फायदा मध्यमवर्गीयांना होणार आहे. यामुळे मासिक घरखर्चात बचत होऊ शकते, असं पुण्यातील अनुजा पाटील म्हणतात.......

**बावीस सप्टेंबर पासून जे आपले जीएसटी मध्ये बदल करण्यात आलेले आहेत. म्हणजे जीएसटी चा जो स्लॉट चार स्लॉट होते त्याचे आता पाच पर्सेंट आणि अठरा पर्सेंट पुढे जाणार आहेत आणि अठ्ठावीस पर्सेंट आणि बारा पर्सेंट संपुष्टात आलेले आहेत. तर याचा गृहिणी म्हणून मला खरंच खूप आनंद होतोय. कारण जो अठरा टक्क्याचा जीएसटी होता तो दूध असू दे, घरचं धान्य असू दे किंवा सुकामेवा असू दे. जी आपली घरातली मुलं आहेत, त्यांचा जो खाऊ आहे कॉर्नफ्लेक्स, बिस्किट, कोको पावडर वगैरे याच्यावरचे पण जीएसटी पाच टक्के करण्यात आलेले आहेत. हे खरंच खूप दिलासादायक आहे. कारण एक गृहिणी म्हणून किंवा एक मध्यमवर्गीय म्हणून ही जी बचत होणार आहे ही खरंच खूप दिलासादायक आहे.**

**तुळजाभवानी नवरात्र**

तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी देवीच्या नवरात्र महोत्सवाला राज्यातील प्रमुख महोत्सवाचा दर्जा दिल्याची माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी काल दिली. कोल्हापूरचा शाही दसरा महोत्सवही आता राज्याच्या प्रमुख महोत्सवांच्या यादीत समाविष्ट झाला आहे. राज्याच्या पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागानं या महोत्सवाला अधिकृत मान्यता दिली आहे.

**भरणे-कृषी पंचनामे**

ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यातले पंचनामे पूर्ण झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यात आली आहे. उर्वरीत क्षेत्रांच्या पंचनाम्याचं काम सुरू असून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना सुरू असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल दिली. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातल्या 30 जिल्ह्यातील 195 तालुक्यांमध्ये मोठं नुकसान झालं असून, 654 महसूल मंडळातील खरीप पिकांना या पावसाचा फटका बसला आहे. या काळात राज्यात 17 लाख 85 हजार 714 हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले असून प्रामुख्याने खरीप शेतपिकांचे नुकसान झाल्याची माहिती त्यांनी दिली.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात कालही जोरदार पाऊस पडला; येत्या 24 तासांतही सर्व विभागांमध्ये अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.